डिलिमिटेशन विधेयक मंजुरीसाठी ३६० मतं आवश्यक

४१ खासदारांची जुळवा जुळव करावी लागणार

नवी दिल्ली (वृत्तसंस्था) केंद्र सरकारने ३० नोव्हेंबरपासून संसदेचं विशेष अधिवेशन बोलावण्याची घोषणा केल्यानंतर डिलिमिटेशन (मतदारसंघ पुनर्रचना) विधेयक पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे. भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीला लोकसभेत हे विधेयक मंजूर करवून घेण्यासाठी दोन तृतीयांश बहुमताची म्हणजे ३६० खासदारांच्या मतांची आवश्यकता आहे. पावसाळी अधिवेशनात विरोधकांनी केंद्र सरकारने मांडलेले हे विधेयक हाणून पाडले होते. मात्र, आता शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेससह, द्रमुक व अन्य पक्षांच्या भूमिकेत बदल झाल्याचे पाहायला मिळत आहे. याशिवाय, शिंदे सेनेने ठाकरे गटाचे सहा खासदार फोडल्यामुळे लोकसभेतील त्यांचे संख्याबळ वाढले असून याचा फायदा एनडीएला होणार आहे.



विधेयकाला विरोध करणारे पक्ष

आम आदमी पक्ष: ३
काँग्रेस-१००
शिवसेना (ठाकरे गट)-३
समाजवादी पार्टी : ३७
टीएमसी ममता बॅनर्जी पक्ष: ८
मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष : ४
सीपीआय : २
सीपीआयएमएल : २
झारखंड मुक्ती मोर्चा-३
राष्ट्रीय जनता दल-४
इंडियन युनियन मुस्लिम लीग-३

एनडीए आघाडीतील घटक पक्ष
भाजप: २४१
तेलुगू देसम पक्ष: १६
शिवसेना (एकनाथ शिंदे): १३
जनता दल (युनायटेड) : १२
लोक जनशक्ती पक्ष (रामविलास) : ५
जनता दल (धर्मनिरपेक्ष) : २
जनसेना पक्ष : २
राष्ट्रीय लोकदल : २
अपना दल (एस) : १
आसाम गण परिषद : १
एजेएसयू पक्ष : १
हिंदुस्तानी अवाम मोर्चा : १
राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) : १
सिक्कीम क्रांतिकारी मोर्चा : १
यूपीपीएल : १
एनसीपीआय (तृणमूलमधून बाहेर पडलेले) : २०
शिरोमणी अकाली दल : १

एकूण ३२१

एनडीएबाहेरील समर्थक
(मागील वेळी मदत केलेले)
- वायएसआर काँग्रेस ह्न ४
- अपक्ष ह्न १

- एकूण संख्याबळ- ३२६

इंडिया आघाडीतून एनडीएला पाठिंबा देणारे पक्ष


द्रमुक, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), यांचे समर्थन मिळण्याची शक्यता, ते मिळाल्यास
- द्रमुक ह्न २२
- राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) ह्न ८

- एकूण संभाव्य एकूण संख्याबळ-३५६

नारी शक्तीला केलेले 'प्रॉमिस' पूर्ण करणारच..! पंतप्रधान मोदी यांची पोस्ट

२०२९च्या लोकसभा निवडणुकांपासून महिला आरक्षण लागू करण्याच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने मंत्रिमंडळाच्या माध्यमातून सीमांकन विधेयकाला मंजुरी दिली आहे. या विधेयकांनुसार लोकसभा आणि राज्य विधानसभेतील जागांची संख्या वाढवण्याचा प्रस्ताव आहे, ज्यामुळे महिलांसाठी ३३% आरक्षण लागू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यादरम्यान, पंतप्रधाननरेंद्र मोदी यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट शेअर करून महिला आरक्षणाबाबत आपली वचनबद्धता पुन्हा एकदा व्यक्त केली.

पंतप्रधान मोदींनी सांगितले की, ते महिलांना दिलेले वचन पूर्ण करतील आणि महिला आरक्षणाला विरोध करणारे पक्ष त्यांना महिलांचा सहभाग वाढवण्यापासून रोखू शकणार नाहीत. 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट शेअर करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, महिला आरक्षणाच्या माध्यमातून संसद आणि विधानसभेत महिलांचा सहभाग वाढवण्याचे प्रयत्न अनेक दशकांपासून सुरू आहेत. ते स्वतः



बाबासाहेब यांच्या काळापासून या दिशेने प्रयत्न करत आहेत आणि अनेक महिलांनी त्यांच्यासोबतच्या बैठकांमध्ये हा मुद्दा उपस्थित केला आहे. त्याचबरोबर, अनेक महिलांनी महिला आरक्षणाबाबतच्या आपल्या चिंता आणि अपेक्षा व्यक्त करणारी पत्रे लिहिली आहेत. ते देशातील प्रत्येक महिलेला आश्वासन देतात की, महिला आरक्षण लागू करण्याच्या मार्गात येणारे सर्व अडथळे सरकार दूर करेल. महिला आरक्षण लागू करण्यासाठी, केंद्र सरकारला २०२९ च्या लोकसभा निवडणुकांपूर्वी संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करायची आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये, संसदेने 'नारी शक्ती वंदन कायदा' मंजूर केला, ज्यामध्ये लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३% जागांच्या आरक्षणाची तरतूद आहे.

beedsarkar
संपादक-आदोडे साहस
E-mail : beedsarkar @ Gmail.com
E-mail : beedsarkar @ Gmail.com किंमत: १ रू. पाने : ४

बीडसरकार

बीड महाराष्ट्र वर्ष १३ वे अंक ३३७ शनिवार २८ नोव्हेंबर २०२६ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दि.२९ नोव्हेंबर २०२६ पाने ४ किंमत १ रू.


Beed MAHARASHTRA Year 13 Issu 337 Saturday 28 November 2026 RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027

२०११ पर्यंतची सरकारी जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित होणार

फडणवीस सरकारचा महत्त्वाचा निर्णय

मुंबई (सरकार): राज्यातील सरकारी जमिनीवरील २०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे नियमित करण्याच्या प्रक्रियेला राज्य सरकारने मोठा वेग दिला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासाठी विधानसभास्तरीय आढावा समितीच्या सहअध्यक्षांची नियुक्ती केली असून, राज्यात ११५ सहअध्यक्षांच्या नियुक्तीचा अधिकृत शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

या निर्णयामुळे राज्यातील लाखो सर्वसामान्य कुटुंबांच्या डोक्यावरील बेघर होण्याची टांगती तलवार कायमची दूर होणार आहे. तसेच, वर्षानुवर्षे सरकारी जमिनीवर वास्तव्य करणाऱ्या या कुटुंबांना त्यांच्या घरांचा कायदेशीर मालकी हक्क मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. शासनाच्या या लोककल्याणकारी निर्णयाची अंमलबजावणी प्रभावीपणे आणि पारदर्शकपणे व्हावी, यासाठी विधानसभा मतदारसंघनिहाय आढावा समित्यांवर ११५ सहअध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे.



यामुळे प्रलंबित प्रकरणे मार्गी लागून सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

आणखी एक क्रांतिकारी निर्णय म्हणजे राज्यातील शहरी भागातील सदनिका धारकांना आता खिशात सहज ठेवता येईल असं डिजिटल प्रॉपर्टी कार्ड देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतलाय. त्यामुळे मालमत्तांचे वाद कायमचे मिटणार आहेत. जमिनीच्या सातबाराच्या धर्तीवर स्वतंत्र ओळख आणि सदनिका धारकांना कायदेशीर हक्क देणारं व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड देण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यातील अंदाजे सात कोटी सदनिका धारकांना दिलासा मिळणार आहे.या कार्डमध्ये फ्लॅटची कुंडली, सदनिकेवर असलेल बँकेच कर्ज, गहाणखत, मालमत्ता कर किंवा सोसायटीची थकबाकी न्यायालयीन निर्बंध किंवा शासकीय देणी असल्यास त्याची थेट नोंद संबंधित प्रॉपर्टी कार्डवर होईल. बिल्डरचं कर्ज मुख्य नोंदीवर तर वैयक्तिक कर्ज संबंधित सदनिका धारकाच्या कार्डवर दिसेल. अधिकृत बांधकाम, मंजूर नकाशा आणि संबंधित कागदपत्र असलेल्या प्रकल्पाना हे कार्ड देण्यात येईल.

फ्लॅटमध्ये राहणाऱ्या घर मालकांना देतो आहे याचा जो ड्राफ्ट आहे तो आज पब्लिक डोमेनमध्ये महसूलच्या पब्लिक डोमेनमध्ये टाकतो आहे. ३० दिवस हा पब्लिक डोमेन मध्ये राहील आणि ज्या काही यामध्ये सूचना येतील हरकती येतील, त्यावर आम्ही अंतिम नियमावली पुढच्या दोन महिन्यात, एक महिना पब्लिक डोमेन, दोन महिने आम्ही आणि मग ही नियमावली तयार करून नियमामध्ये सुधारणा करून व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड या राज्यामध्ये लागू होईल, अशी माहिती देखील महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आहे.

उसाला ३,५०० रुपये दर द्या;अन्यथा १२ डिसेंबरनंतर आंदोलनाचा इशारा!

भाजपच्या केज तालुका शाखेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

केज (सरकार)तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थितीमुळे ऊस उत्पादनात मोठी घट होत असताना साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा आरोप भारतीय जनता पक्षाच्या केज तालुका शाखेने केला आहे. उसाला प्रतिटन किमान ३ हजार ५०० रुपये दर द्यावा, यासह पाणीटंचाई, चारा आणि ऊस तोडणीसंदर्भातील विविध मागण्यांसाठी भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. या मागण्यांची पूर्तता न झाल्यास १२ डिसेंबरनंतर केज तहसील कार्यालयासमोर उपोषणासह तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, तालुक्यात पाणीटंचाईमुळे उसाचे एकरी उत्पादन अंदाजे २५ टनांपर्यंत खाली आले आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत येडेश्वरी शुगर, गंगा माऊली शुगर आणि अंबा सहकारी साखर कारखान्यांकडून उसाला प्रतिटन केवळ २ हजार ८०० ते ३ हजार रुपये दर दिला जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. हा दर राज्यातील सर्वात कमी असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.



याशिवाय ऊस तोडणीची बिले १५ दिवसांच्या आत अदा करावीत, कार्यक्षेत्राबाहेरील उसाला दिले जाणारे प्राधान्य थांबवावे, तसेच प्रतिटन २ हजार ४०० ते २ हजार ५०० रुपये दराने होणारी ऊस खरेदी बंद करून पाण्याअभावी वाळत असलेला ऊस प्राधान्याने गाळपासाठी न्यावा, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत.

वजनकाट्यांची तपासणी : साखर कारखान्यांतील वजनकाट्यांची भरारी पथक किंवा वैधमापनशास्त्र विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करण्यात यावी. जनावरांच्या चाऱ्यासाठी उसाचे क्षेत्र राखीव ठेवावे : आगामी काळातील चारा टंचाई लक्षात घेता जनावरांसाठी योग्य असलेले उसाचे क्षेत्र संरक्षित करून चाऱ्यासाठी राखीव ठेवावे.जलजीवन मिशनच्या योजना पूर्ण कराव्यात : बीड जिल्ह्यात ७५ टक्के काम पूर्ण झालेल्या जलजीवन मिशनच्या योजना तातडीने पूर्ण करून नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे.तसेच खासगी बोअरवेल आणि विहिरी पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित कराव्यात.मांजरा धरणाचे पाणी पिण्यासाठी राखीव ठेवावे : केज तालुक्यातील मांजरा धरणातून लातूर एमआयडीसी आणि शेतीसाठी सुरू असलेला पाणीपुरवठा तातडीने बंद करून उपलब्ध पाणी पिण्यासाठी राखीव ठेवावे.

या निवेदनावर केज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अंकुशराव इंगळे, उपसभापती डॉ. वासुदेव नेहरकर, जिल्हा परिषद सदस्य संतोष हांगे, भाजपचे तालुकाध्यक्ष भगवान केदार, ज्येष्ठ मार्गदर्शक गिरीष देशपांडे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष महादेव सूर्यवंशी आणि माजी उपसभापती सुरेंद्र तपसे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आता प्रशासन या मागण्यांची कितपत दखल घेते आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळतो का, याकडे केज तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

जनावरांच्या झुंजींवर बंदी असतानाही बीड खुलेआम झुंजी चालू

बीड (प्रतिनिधी)मुक्या जनावरांच्या झुंजींवर बंदी असतानाही बीड शहरालगत इमामपूर येथील ज्योतिबा मंदिर परिसरात शुक्रवार, २७ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन वाजता खुलेआम टकरी लावण्यात आल्या. बार्शी नाका व बीड शहरातील काही युवा नेत्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती आहे. टकरींमध्ये अनेक जनावरे जखमी झाली असून काहींच्या अंगावर रक्त दिसत असल्याचे व्हायरल व्हिडिओतून समोर आले आहे. विशेष म्हणजे, कार्यक्रमाच्या एक दिवस आधीच पोलिसांकडे फोटो, बॅनर आणि माहिती



पोहोचली होती. तरीही पोलिसांनी झुंजी रोखण्यासाठी कारवाई का केली नाही, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.नकाशे पहा

या कार्यक्रमासाठी आयोजकांकडून वर्गणी गोळा केली जात असल्याची माहिती आहे. जनावरांच्या टकरींसोबतच 'सोरट' नावाचा जुगार खेळवला जात असून त्यातून लाखोंची उलाढाल होत असल्याची चर्चा आहे. यासंदर्भातील व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. त्यामुळे आयोजक, वर्गणी गोळा करणारे आणि जुगार चालविणाऱ्यांची चौकशी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

र्यक्रमाच्या एक दिवस आधीच पोलिसांना फोटो, बॅनर आणि माहिती मिळाली होती, असा दावा केला जात आहे. मग पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई का केली नाही? घटनास्थळी पथक का पाठवले नाही? जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले का? आयोजकांसोबत काही तडजोड झाली होती का? मोठ्या जनावरांच्या टकरींना स्थानिक पोलिसांचे पाठबळ आहे का? असे गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

संपादकीय

कोयतानगरीच्या दिशेने..

सांस्कृतिक राजधानी, विद्येचे माहेरघर, देशातील व राज्यातील महत्त्वाचे शैक्षणिक आणि औद्योगिक केंद्र तसेच पेन्शनरांचे शांत शहर ही पुण्याची ओळख आहे. परंतु, मागच्या काही वर्षांतील घटना पाहता शहराचा प्रवास कोयतानगरीच्या दिशेने सुरू असल्याचे दिसते. शिवाजीनगर न्यायालयासमोरील 'गँगवॉर' वा कोयता हल्ला हा त्याचाच भाग म्हणता येईल.

पुणे तिथे काय उणे,' असे म्हणतात. स्वातंत्र्यलढा, समाजसुधारणांपासून ते सांस्कृतिक, शैक्षणिक, औद्योगिक विकासापर्यंत प्रत्येक आघाडीवर या शहराने, येथील माणसांनी योगदान दिले आहे. परंतु, मागच्या काही दिवसांपासून या शहराला टोळीयुद्धाने व कोयता हल्ल्यांनी ग्रासल्याचे दुर्दैवी चित्र पहायला मिळते. शिवाजीनगर न्यायालयासमोरील गोळीबार व कोयताहल्ल्याची घटना हा त्याचा कळसाध्याय. एका खून प्रकरणात जामीन मिळालेला आरोपी न्यायालयात काय येतो आणि अल्पवयीनांसह पाच ते सहा जण हाताचा पंजा तुटेपर्यंत त्याच्यावर सपासप वार काय करतात, हे सगळेच दृश्य थरकाप उडविणारे होय. खरे तर न्यायमंदिराबद्दल आजही लोकांच्या मनात आदराची भावना आहे. त्यामुळे न्यायासाठी लोक अजूनही कोर्टाची पायरी चढतात. अशा या पवित्र वास्तूच्या आवारातच खुनीहल्ला वा रक्तपात होत असेल, तर गुन्हेगार किती निर्ढावलेले आहेत, यावर प्रकाश पडतो. वास्तविक, अलीकडेच पुणे न्यायालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर न्यायालय परिसरात अधिकचा पोलीस बंदोबस्त असणे आवश्यक होते. परंतु, तरीही पुरेशी कुमक बाळगली जात नसेल, तर पोलीस प्रशासनाच्या एकूणच कार्यक्षमता व निर्णयक्षमतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाल्याशिवाय राहात नाही. मुळात कोर्टासमोर आरोपी खुले आम गोळीबार करतात, कोयता नाचवण्याचे धाडस दाखवतात, हे एकप्रकारे कायद्यालाच दिलेले आव्हान आहे. त्यामुळे केवळ अटकेची वा मोक्काची कारवाई करून भागणार नाही, तर दिसेल तिथे गुन्हेगारांच्या मुसक्या आवळाव्या लागतील. मागच्या काही वर्षांत पुण्याने टोळीयुद्धाच्या अनेक घटना व त्यातून होणारा खूनखराबाही उघड्या डोळ्यांनी बघितलेला आहे. अलीकडेच माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची झालेली हत्या, त्यानंतर आयुष कोमकरचा झालेला खून, आंदेकर व कोमकर टोळीतील संघर्ष याशिवाय शहराच्या विविध भागांत दोन-पाच दिवसाआड होणाऱ्या कोयता हल्ल्यांनी पुण्यातील कायदा सुव्यवस्थेसह येथील एकूणच शांततापिय जीवनशैलीचा मुडदा पाडत असल्याचे चित्र आहे. कोयता गँग वा कोयता हल्ले हा तर येथील नित्याचा भाग बनला आहे. केशवनगर-मांजरी रस्त्यावर एका गृहनिर्माण सोसायटीमध्ये वर्चस्ववादातून दोन गटांमध्ये कोयतायुद्ध रंगल्याचे दृश्य व्हायरल झाले होते. एका रेस्टॉरंटमध्ये दारूसाठी पैसे न दिल्याने टोळक्याने तरुणाला मारहाण केल्याची घटनाही ताजीच आहे. पिंपरी-चिंचवडमध्येही कोयते नाचवत दहशत माजविण्याचा एक ट्रेंडच निर्माण झाला आहे. कोयता हल्ला, खून, मारामाऱ्यांशिवाय अत्याचार, बलात्कार, अपहरण वा तत्सम घटनांमध्येही हे शहर मागे नाही. परंतु, तरीही यावर पोलीस प्रशासन फारसे गंभीर दिसत नाही. त्यामुळे पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीने सध्या जोर धरला आहे. राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री हवा, अशी मागणीही विरोधी पक्षांनी लावून धरली आहे. राज्याचे कार्यक्षम मुख्यमंत्री ही देवेंद्र फडणवीस यांची ओळख आहे. परंतु, गृहखात्याला ते पुरेसा न्याय देत नसतील, तर त्यांनीच याबाबत आत्मपरीक्षण केलेले बरे. एखादे शहर वाढले, की काही आव्हाने उभी राहणे, हेही ओघाने आलेच. तथापि, पुण्याची तुलना बिहारशी व्हावी, हे काही भूषणावह ठरू नये. म्हणूनच गुन्हेगारी टोळ्यांचे नेटवर्क उद्ध्वस्त करतानाच कोयता कल्चरला चाप लावणे आवश्यक ठरते. अन्यथा, कोयते पुण्याच्या समाजजीवनाचीही कत्तल करण्याचा धोका आहे. अशावेळी पोलिसांची भूमिका ही अतिशय महत्त्वाची असणार आहे. प्रशासनाच्या मदतीने अशा टोळ्यांचा पोलिसांनी योग्य तो बंदोबस्त करणे गरजेचे असणार आहे. तसेच कायदा, सुव्यवस्था राखण्याचे अवघड आव्हान पोलीस यंत्रणेला पेलावे लागणार आहे.

सोशल मीडियातून नात्यांचं 'नेटवर्किंग'

तंत्रज्ञानामुळे जग जवळ आलं आहे. प्रत्येक जण एकमेकांशी फेसबुक, व्हॉट्सॲप अशा कोणत्या तरी माध्यमातून संपर्कात आहे. मग एकमेकांच्या संपर्कात राहण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर न करता मागे राहील, तर ती तरुणाई कसली! तरुण पिढीची अनेक नवी नाती याच नव्या सोशल कट्ट्यांवर खुलतात. हल्लीची तरुणाई सध्या सोशल मीडियाच्या मदतीने नात्यांचं 'नेटवर्किंग' करण्यात जास्त रमलेली दिसते. पण या तरुणांना नाती खरंच किती कळतात हा प्रश्नच आहे.

आजकालच्या तरुणाईचा कुटुंबीयांवर असतो तेवढाच विश्वास फेसबुक, व्हॉट्सॲप फ्रेंड असणाऱ्या मित्रावर किंवा मैत्रिणीवर असतो, तोही अगदी सहजासहजी बसलेला असतो. त्यांची बहुतेक नाती, मग ते मित्र-मैत्रिणीचं असेल किंवा प्रेमातलं, ही सोशल मीडिया पुरस्कृत असतात असं म्हणायला हरकत नाही. कारण प्रत्यक्ष भेटीला वेळ मिळत नसेल तरीही सोशल कट्ट्यावर फेसबुक, व्हॉट्सॲपसारख्या ॲप्लिकेशन्समुळे ही ऑनलाईन नाती घट्ट केली जातात. त्यांची खबरबात घेतली जाते.

नेहमीच न भेटणा-या मित्र-मैत्रिणींना प्रत्यक्ष भेटण्याचं वचन दिलं जातं. पण वेळेअभावी प्रत्येक वेळेला 'पुन्हा कधीतरी भेटू'चं आश्वासन देऊन नवीन योजना आखल्या जातात. ओढ वाढत जाते. अशा प्रकारे अनेकांपर्यंत जास्तीत जास्त पोहोचता येतं. सगळ्यांशी कनेक्ट राहता येतं. सकाळी गुड मॉर्निंगच्या आणि रात्रीच्या गुड नाईटच्या संदेशाशिवाय तरुणाईचा दिवस उजडतही नाही आणि मावळतही नाही.

फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप, व्हायबर इत्यादी हे सध्या 'कनेक्ट' राहण्यासाठीचे युवा पिढीचे आघाडीचे साथीदार. त्यांच्यामुळे मित्र-मैत्रिणींचा सतत संपर्कात राहता येतं, शिवाय ग्रुप असेल तर सर्व बित्तंबातम्या इतरांना पोहोचवता येतात. कॉलेजमधल्या प्रेमीयुगुलांसाठी तर हे एक वरदानच आहे.

पण आजच्या तरुण पिढीला सोशल मीडियाची ही चांगली बाजू किती चांगल्या प्रकारे वापरता येते? ऑनलाईन मैत्रीतले फायदे-तोटे हे सर्वच तरुण-तरुणींना कळतात असं नाही. सोशल कट्ट्यामुळे नात्यांमधला गोडवा टिकवताही येतो हे कळणं



कधीकधी कठीण व्हावं असेही प्रसंग पाहायला मिळतात. काल एका मैत्रिणीचा फोन आला. ती रडक्या स्वरातच म्हणाली, 'कामाच्या गडबडीमुळे दिवसभर ऑनलाईन नाही राहता आलं. याचा वेगळाच अर्थ माझ्या मित्राने काढला, त्याला साधी चौकशीही करावीशी वाटली नाही. त्याने सरळ फोन करून सांगितलं की, आता तुझा नि माझा काहीच संबंध नाही. तुला माझ्यासाठी वेळ देता येत नाही, तर नात्यामध्ये राहायचं तरी कशाला?'

आजकालचं जग जसं प्रत्येक गोष्टीत ऑनलाईन होत जातंय, तसंच नातं टिकवण्यासाठीही ऑनलाईन व्हावं लागेल की काय हा प्रश्न पडतो? हे असं का घडतं तर, प्रत्यक्ष माणसापेक्षा सोशल मीडियावर किंवा तांत्रिक माध्यमांवर जास्त विश्वास ठेवल्यामुळेच. कोणाशीही संपर्क ठेवायचा तर तरुणांची पहिली पसंती असते ती या सोशल कट्ट्यालाच. मात्र त्यावर अति विसंबून राहू नये, हे कळण्याची समज या वयात नसते. तंत्रज्ञानाचे फायदे असतात तसे तोटेही असतात. यातूनच निर्माण होतात समज-गैरसमज. आता पाहा ना.. व्हॉट्सॲपचंच उदाहरण घेऊ. तिथे तर दर आठवडय़ाला काही ना काही बदल घडत असतात. नियम बदलत असतात. त्यामुळे आपले मेसेजेस कोण वाचतंय, कोणापर्यंत पोहोचलेत, अशी सर्व माहिती मिळत असते. सध्या व्हॉट्सॲपवर मेसेज रीडिंगची निळ्या रंगाची टिक येते, याचा अर्थ असा की आपण मेसेज वाचला हे समोरच्याला कळतं. यामुळे झालंय काय तर, आपला संदेश समोरच्यापर्यंत पोहोचलाय हे तर कळतंच; पण तिथून त्वरित कोणताच रिप्लाय नाही आला की समोरच्याच्या मनात आपल्याविषयी आदरच नाही, प्रेमच नाही असा निष्कर्ष काढून आपण मोकळे होतो. यातून अनेक वादविवाद, भांडणे होतात आणि परिणामी नातं कायमचं तुटतं. समोरच्याला समजून घेणं, प्रत्येकाला स्वत:ची स्पेस देणं हेही मैत्रीइतकंच महत्त्वाचं असतं हे तरुण वयाच्या जोशात कळत नाही. मैत्रीचं नातं कसं टिकवता येईल? त्यासाठी काय करावं? काय नेमकं करू नये? यासंबंधीचेही अनेक संदेश फिरत असतात, परंतु या संदेशांचा वापर फक्त वाचण्यापुरता आणि संदेश दुसरीकडे (फॉरवर्ड)करण्यापलीकडे केलाच जात नाही. नेहमीच्या आयुष्यातही त्या संदेशाप्रमाणे वागता आलं तर नातं डिसकनेक्ट होणारच नाही ना! आणि नातं कनेक्टेड राहावं यासाठी सतत ऑनलाईन राहण्याचीही गरज भासणार नाही. व्हॉट्सॲपचा लास्ट सिन स्टेट्स बघून प्रेम ठरवणारी आजची तरुण पिढी किती तकलादू नातं बनवण्याचा प्रयत्न करतेय! एकमेकांशी कनेक्ट राहायच्या नादात समोरच्यालाही काहीतरी स्वतंत्र अस्तित्व असतं, जीवन असतं हे पार विसरून जातो. कुठे आहेस? काय करतेस/करतोस? कोणासोबत आहेस? असे फालतू, खासगीपणावर आक्रमण करणारे प्रश्न सर्रास विचारले जातात. तेव्हा विचार येतो हे नातं म्हणजे प्रेमाचे बंध आहेत की बंधनं? अविश्वासाच्या फे-यात एकमेकांना जीव घुसमटून जाईपर्यंत गुंतवायचं की विश्वासानं केलेल्या प्रेमाचा लगाम सैल सोडायचा हे आपलं आपण ठरवायचं. पूर्वीच्या काळी कितीही लांब असले तरी नात्यांमध्ये रुसवे-फुगवे असायचे; पण अविश्वास नसायचा. 'रोज आठवण न यावी असे होत नाही.. रोज भेट घ्यावी यालाही काहीच हरकत नाही. मी तुला विसरणार नाही, याला विश्वास म्हणतात.. आणि तुला याची खात्री आहे याला मैत्री म्हणतात' हा एक सुंदर संदेश व्हॉट्सॲपवर नेहमीच फिरत असतो. फक्त वाचण्यापुरता आणि पुढे पाठवण्यापुरता (फॉरवर्ड) याचा वापर करण्यापेक्षा ते समजून घेतलं पाहिजे. तरच आयुष्याची खरी गंमत कळेल. तरुणाईसाठी आजकाल नाती या सोशल नेटवर्किंग साईटवरच जास्त खुलतात आणि अतिरेक झाला की समोरच्याला ब्लॉक करून ती संपतातही. लास्ट सीन काय किंवा रीडिंग टिक काय, या गोष्टी एकमेकांविषयी असलेलं प्रेम, आपुलकी सिद्ध करू शकत नाही. संभाषण होणं गरजेचं असतं. ते भेटून जास्त उत्तम प्रकारे होतं. सततच्या आभासी संपर्कामुळे समोरच्याविषयीची ओढ कमी होते. म्हणूनच एक दिवस सोशल नेटवर्किंग साईटसाठी उपवास धारण करा. आवडणा-या नव्या-जुन्या मित्र-मैत्रिणींची आपसुकच आठवण येईल. या ऑफलाईन स्टेटसमुळे संपर्क काही काळ तुटेल; पण मनातून निर्माण झालेली भावना मैत्रीचं नातं घट्ट करेल. मैत्रीच्या नात्यातली आपुलकी आणि जिव्हाळ्याचा खरा अर्थ तेव्हा कळेल. 'शब्द बनून पुस्तकांमध्ये भेटू आपण.. सुगंध बनून फुलांमध्ये भेटू आपण.. काढशील आठवण जेव्हा माझी अश्रू बनून डोळ्यांमध्ये भेटू आपण.' ही ओळ नात्यांमधील जिव्हाळ्याचं ख-या अर्थान वर्णन करते.

जाणून घ्या तुमच्या बाळाचा आहार!

अनेक नवमातांना बाळाच्या आहाराच्या गरजांविषयी फार माहिती नसते. आधुनिकीकरण, छोटे कुटुंब, घरी मदत उपलब्ध नसणे आणि इंटरनेटमधून मिळणारी अपूर्ण माहिती यामुळे त्यांच्या तणावाच्या पातळीत भरच पडते. अशा अनेक माता मग फॉर्म्युला दुधाचा आधार घेतात आणि बाटलीने त्यांच्या बाळांना पाजतात. हे अजिबात योग्य नाही, कारण आईचे दूध हेच बाळासाठी सर्वोत्तम असते आणि बाटलीने दूध पाजल्याने दीर्घकालीन परिणाम होतात. बाळाचा जन्म झाल्यानंतर तासाभरात मातांनी स्तनपान सुरू करणे हितकारक असते. बाळासाठी स्तनपान हे पूर्णान्न असते आणि पहिले सहा महिने बाळाला पाण्याचीही आवश्यकता भासत नाही. संशोधनानुसार, ज्या बाळांनी पहिले सहा महिने केवळ स्तनपान केले आहे, त्यांना न्यूमोनिया, ॲलर्जी, पोटाला आतडय़ाला आणि



श्वसनमार्गाला संसर्ग होण्याची शक्यता कमी असते आणि ते अधिक बुद्धिमान असतात. तरी बाळ ६ महिन्यांचे झाल्यावर बाळाला दैनंदिन आहाराची गरज भागविण्यासाठी इतर पदार्थांचीही आवश्यकता भासते. ६ महिन्यांनंतर स्तनपानासह बाळाला पूरक अन्न, जसे - वरण-भात, खिचडी, भाज्या घालून केलेली खिचडी, भरड किंवा आंबील आणि फेळे कुस्करून द्यावीत. हे पूरक पदार्थ घरी तयार केलेले, ताजे, पूर्ण शिजलेले असावेत आणि प्युरीच्या प्रकारात द्यावेत.

सुरुवातीला पातळ पदार्थ द्यावेत, त्यानंतर त्याची घनता वाढवत नेऊन सेमीसॉलिड (अर्धघन) आणि घन पदार्थ (सॉलिड) खाऊ घालावेत. सुरुवातील जेवण दिवसातून दोन वेळा द्यावे, त्यानंतर जसजसे वय वाढत जाईल, तसतसे दिवसातून ३ ते ४ वेळा जेवण द्यावे. २ वर्षे पूर्ण होईपर्यंत स्तनपान सुरू ठेवावे. अंडय़ाचा पांढरा भाग आणि गाईचे दूध हे बहुधा ९ ते १२ महिन्यांदरम्यान सुरू करावे. ते लवकर केले असता, बाळाला ॲलर्जी होण्याची शक्यता असते. खूप द्रव पदार्थ म्हणजे डाळीचे पाणी, भाताची पेज, फळांचे रस देणे टाळावे. कारण, त्यामुळे बाळाला पुरेसे तंतू मिळत नाहीत. चणे/सुका मेवा हेसुद्धा पावडरच्या रूपात अथवा शिजवून द्यावेत. नवजात बालकाच्या आहारात साखर, मीठ आणि मसाले अत्यंत कमी प्रमाणात घालावेत. भारतात बाळांना बिस्कीट आणि दूध भरविण्याची परंपरा आहे, जी बाळाच्या आरोग्यासाठी अजिबात चांगली नाही. पोषणाच्या दृष्टीने तो अत्यंत निरुपयोगी असतो. कारण, त्यात क्षार, मायक्रो न्युट्रिअंट्स आणि तंतू समाविष्ट नसतात. त्यामुळे बाळामध्ये लोहाची कमतरता आणि बद्धकोष्ठता येते. भारतात त्याला 'मिल्क-बिस्कीट' सिण्ड्रोम म्हणतात. तो आता सिद्ध झाला आहे आणि जे बाळ हा आहार घेते त्याला रक्तक्षय होण्याचीही शक्यता असते. पहिली दोन-तीन वर्षे मुलांना बिस्किटे देणे टाळावे.वयानुसार द्यावयाचा आहारपहिले सहा महिने केवळ स्तनपान ६ ते ७ महिने - लिक्विड आणि सेमी सॉलिड डाळी, भरड, भाज्यांचे सूप (गाळून) ८ ते ९ महिने - भाताची खीर, उकडलेला बटाटा, बीटरूट आणि गाजराचे सूप, हंगामी फळे, रोजचे आंबील, इडली, उपमा १०-१२ महिने - अंडय़ाचा बलक आणि भात, भाज्यांचे सूप, ज्वारीचे आंबील, ओट्स, नाचणी १२-२४ महिने - विविध पिठांचा पराठा/घावण, थालीपीठ, कढी इत्यादी.

एसीचा गारवा अनुभवताना..

घरात एसी बसवताना तो किती टनाचा एसी हवा हे घराची जागा तसंच सूर्यप्रकाशाची तीव्रता यावर अवलंबून असतं. तो योग्य ठिकाणी बसवला जाणंही गरजेचं आहे. एसीसाठी स्वतंत्र इलेक्ट्रिकल पॉइंट्सची आवश्यकता असते. त्याशिवाय आगीपासून बचावासाठी मिनिएचर सर्किट ब्रेकरचीही गरज असते. खिडकीत बसवायचा एसी खिडकीतल्या चौकटीत व्यवस्थित बसायला हवा नाही तर पावसाळ्यात लिकेजचा त्रास होऊ शकतो. अशा प्रकारचा एसी हा रूमच्या मधोमध उंचीवर अथवा उंचावर असावा म्हणजे संपूर्ण रूममध्ये हवा खेळती राहू शकते. एसीचं आयुष्य वाढवायचं असल्यास वेळोवेळी सर्व्हिसिंग करून कॉइल्स साफ करायला हव्यात. समुद्रकिना-याजवळील परिसरात एसी लवकर खराब होतो. धूळ आणि हवा दोन्हींमुळे एसीची कॉइल जाम होऊ शकते. एसीच्या विरुद्ध दिशेने येणा-या वा-यामुळेदेखील मोटर डॅमेज होऊ शकते. एसीमध्ये वेदर गार्ड बसवून घेतल्यास एसीचे आयुष्य वाढू शकते. विजेच्या भारनियमनामुळे एसीची कार्यक्षमता कमी होते. अशा विभागांमध्ये वोल्टेज स्टॅबिलायझर बसवणं आत्यंतिक महत्त्वाचं आहे. विजेचा दाब कमी झाल्यास एसी रिमोट कंट्रोलने बंद न करता मेन स्विच बंद करावा. एसीच्या कुलिंग टॉवरमधील पाणी खराब अथवा हार्ड वॉटर असल्यास एसीचे आयुष्य कमी होते. त्यासाठी फ्लिटरेशन किंवा सॉफ्टनिंग प्लान्ट बसविणं गरजेचं आहे. दैनंदिन वापरातील एकूण विजेच्या ६०-७० टक्के वीज ही एसीसाठी जाते. त्याची योग्य काळजी न घेतल्यास यात १०-२० टक्क्यांची वाढ होऊ शकते. ❋एसी वापरतानाही विजेची बचत व्हावी यासाठी..❋एसीच्या फिल्टरची आठवडयातून एकदा तरी तपासणी व्हायला हवी.❋रूममधील तापमान विशिष्ट सेल्सिअसवर गेल्यास एसी आपोआप बंद होतो, का ते पाहावे.एसीच्या ट्रेमध्ये पाणी जमून राहते का ते पाहावे.❋वर्षातून दोनदा एसीची सर्व्हिसिंग व्हायला हवी.❋काही एसीमध्ये एनर्जी सेव्हिंग फिचर्स असतात उदा. फॅन, चेंज फिल्टर इंडिकेशन्स किंवा ऑटोमॅटिक टायमर्स इ.

मुलांमध्ये सर्जनशील विचार कौशल्यांची जोपासना कशी कराल?

खरं म्हणजे एका एव्हरेज मुलालाही दिवसभरात शंभर प्रश्न पडत असतात. पण मुलांना त्यांचा पोर्शन तयार करण्याचा, टेस्टसाठी तयारी करण्याचा, रिझल्ट काय लागेल याच्या टेन्शनचा, होमवर्क, असाईनमेंट वेळेत पूर्ण करण्याचा, कधीही न संपणाऱ्या अचिव्हमेंट्स मिळवण्याच्या रेसमध्ये धावण्याचा इतका स्ट्रेस असतो की, मुले प्रश्न विचारणे जणू विसरूनच जातात. दहा ते बारा वर्षांनंतर तर प्रश्न विचारण्यापेक्षा योग्य उत्तरे पाठ करून परीक्षेत लिहिणे, मार्क्स मिळवणे त्यांना महत्त्वाचे वाटते आणि म्हणूनच मुलांमधील सृजनाची, नवनिर्माण करण्याची, काही इनोव्हेटिव्ह, क्रिएटिव्ह करण्याची, तसा विचार करण्याची संधी मुलांना देणे, अनुकूल परिस्थिती मुलांसाठी निर्माण करणे हे जसे पालक म्हणून कर्तव्य आहे तसेच ते पाहणे, अनुभवणे हे आनंददायी आहे हे आपण लक्षात ठेवायला हवे. असे पाहा की, जी मुले 'इनोव्हेटिव्ह थिंकिंग' करतात ते समस्या अगदी सहज सोडवू शकतात. त्याचे कारण म्हणजे इतर मुले ठरवून दिलेल्या रिजिड पद्धतीने प्रॉब्लेम्स सोडविण्याचा विचार करतात. पण 'इनोव्हेटिव्ह थिंकिंग' करणारी मुले आऊट ऑफ बॉक्स जाऊन विचार करतात. मुले खरे म्हणजे निसर्गतःच क्रिएटिव्ह असतात. आपले काम काय तर त्यांना स्वातंत्र्य आवश्यक वस्तू, जागा उपलब्ध करून देणे. जेणेकरून त्यांच्यातील 'इनोव्हेटिव्ह थिंकिंग' अधिक चांगल्या पद्धतीने उमलत राहील. मुलांमधील 'इनोव्हेटिव्ह थिंकिंग' हे त्यांच्या साक्षर होण्याइतकेच महत्त्वाचे आहे. ठरावीक, साचेबंद पद्धतीने प्रश्न न सोडवता त्या गोष्टींकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहणे यात मुलांच्या इनोव्हेटिव्ह थिंकिंगचे रहस्य दडलेले आहे. यासाठी सगळ्यात महत्त्वाचे विशेष म्हणजे 'औत्सुक्य'. हा एक असा कम्पास आहे ज्यामुळे मुले आपल्यातल्या पॅशनला फॉलो करू शकतात.

Curious-Find Out-connect actions-with outcomes अशी ही साखळी असते.

थिंकिंग कल्टिव्हेट करण्यासाठी काय करता येईल?

१) जेव्हा तुमचे मूल एखादा प्रॉब्लेम सोडवण्यासाठी, कठीण होमवर्क पूर्ण करण्यासाठी, असाइन्मेंट्स पूर्ण करण्यासाठी तुमची मदत मागते तेव्हा त्याला रेडिमेड उत्तर देऊ नका. तुला काय वाटते, काय करता येईल? काय करून पाहता येईल? असे विचारले की, मुले इनोव्हेटिव्ह थिंकिंग करायला प्रवृत्त होतात.

२) मुलांबरोबर खेळा पण लीड त्यांनाच करू द्या जेणेकरून ते आपल्या कल्पनेनुसार गेम पुढे नेतात.

३) मुलांना काम करू दे, अंग मळू दे, कपडे खराब होऊ दे, मोकळेपणाने, आनंदाने त्यांना एखादा अनुभव घेऊ दिल्याने, करू दिल्याने



त्यांच्यातील इनोव्हेटिव्ह थिंकिंगला वाव मिळतो.

४) कधी त्यांना कल्पना करता येईल असे प्रश्न विचारा जसे की, तुला जगातल्या प्रत्येक मुलाला काही गिफ्ट करायचे असेल तर काय देशील? तू सायंटिस्ट झालास तर लोकांच्या भल्यासाठी काय करशील?

५) तुम्ही एखादी गोष्ट सांगा आणि ती अपूर्ण गोष्ट पूर्ण त्याला करायला सांगा. मुलांचा विचार, भावना, कल्पना, मन सारे त्यात प्रतिबिंबित होते.

६) स्वयंपाकघरात नवीन पदार्थ तयार करू देत. त्यासाठी आवश्यक साहित्य आणून द्या. त्याने रेसिपीत बदल (टेस्ट, शेप, गार्निशिंग) केले तर करू द्या. ओरिजिनलचे न्यू व्हर्जन करू देत.

७) काही घरातल्या प्रॉब्लेम्सवरही कल्पना करू देत. जसे की आपला हॉल सारखा अव्यवस्थित होतो. तुला काय वाटते काय सोल्युशन्स असू शकतील? त्यामुळे काय होते तर मुलांना जाणवते की, आपल्याला महत्त्व आहे, हे आपले घर आहे. प्रश्न दिले, ते सोडवण्याची संधी दिली की, इनोव्हेटिव्ह थिंकिंगला चालना मिळते.

८) एखादा गेम खेळताना जुन्या रुलसच्या ऐवजी नवीन रूल्स तयार करायला सांगणे व त्यातून एखादा ब्रॅन्ड न्यू गेम तयार करण्याची संधी ही सुद्धा इनोव्हेटिव्ह थिंकिंगला वाव देत असते.

९) मुलांना शाळेत जाण्याचा, दुकानात किंवा ट्यूशनला जाण्याचा नेहमीचा रस्ता तर माहीत असतो.

नवीन रस्ता, पर्यायी रस्ता शोधायला प्रवृत्त करणं यातून शोधक वृत्तीला प्रोत्साहन मिळतं.

१०) समुद्रकिनारी दगड, शंख शिंपले, इतर समुद्री गोष्टी गोळा करणं, त्यांचा शोध घेणं, निसर्गात फिरणं, पानं-फुलं, प्राणी त्यांची जीविका माहीत करून घेणं हे अनुभव सृजनशीलतेला समृद्ध करतात.

११) ड्रेस डिझाईनिंग करणं, खेळणी डिझाईन करणे, किल्ले, जहाजांच्या प्रतिकृती तयार करणे हे फार आवडीचे आणि नवे करण्याचे आव्हान मुलांना खूप आवडते.

१२) आपल्या परस्पेक्टिव्हने एखादा प्रसंग सांगून तुझ्या दृष्टिकोनातून तू कसा मांडशील असे विचारणे हे कल्पनाशक्ती विकसित करण्याची संधी देते.

हे सारे करताना कधी कधी मुलांना अपयशही येईल तेव्हा जाऊ दे असे म्हणण्यापेक्षा तुला हे चांगले, यशस्वी करण्यासाठी काय करता येईल तो विचार कर असे प्रोत्साहित करा. मुलाच्या प्रयत्नांचे कौतुक करा. रिझल्टचे एकवेळ नाही केले तरी चालेल. अतिशय महत्त्वाचे काय तर जेव्हा मुलांना प्रश्न पडतात तेव्हाच खऱ्या अर्थाने मुले शिकतात हे

लक्षात ठेवा.

पाच हजार घेतले, एसीबीला बघताच काढला पळ

बीड (प्रतिनिधी):- जिल्ह्यात वाढत्या लाखोरीवर एसीबीने कारवायांचा फास आवळाला असताना गेवराई एका हवालदाराने पाच हजार घेतले आणि एसीबीच्या टीमला बघताच कार घेऊन पैशांसह धूम ठोकल्याचा खबळजनक प्रकार समोर आला आहे. गेवराई पोलीस ठाण्यातच हा प्रकार घडल्याने आता पुन्हा एकदा हे ठाणे वादात सापडले आहे. पांडुरंग उत्तम दराडे असे त्या हवालदाराचे नाव आहे. एसीबीचे डीवायएसपी सोपान चित्तमपल्ले यांनी दिलेल्या माहितीनुसार चोरीला गेलेल्या कारचा ताबा देण्यासाठी न्यायलयीन आणि कागदपत्री कुटाने टाकून कार फिर्यादीला देतो मात्र पाच हजार द्या अशी मागणी दराडेने केली होती. याची तक्रार एसीबीकडे प्राप्त झाल्यानंतर गेवराई पोलीस ठाण्यात सापळा रचण्यात आला. यावेळी दराडेने स्वतःच्या खाजगी कारमध्ये बसूनच फिर्यादीकडून पाच घेतले यावेळी पंच देखील समक्ष हजर होते. त्यानंतर एसीबीच्या अधिकाऱ्यांना इशारा देताच दराडेने पंच आणि फिर्यादीला कारच्या खाली उतरत धूम ठोकली. यावेळी त्याने पैसे देखील सोबत ठेवले होते. याप्रकारामुळे खळबळ उडाली असून बीड एसीबी पुढील तपास करीत आहे. गेवराईत किशोर पवार यांना नियंत्रण कक्षात संलग्न केल्यानंतर सुकाळे यांच्या कार्यकाळात पुन्हा एकदा ट्रॅपचा प्रकार समोर आल्यामुळे गेवराई ठाणे वादात सापडले आहे.

रामतिर्थावर प.पू. दादा महाराज खडकीकर पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह, श्रीभागवतकथा व विविध कार्यक्रमाचे आयोजन

बीड (प्रतिनिधी):- बीड येथे रामतिर्थावर प.पू. महायोगी दादामहाराज खडकीकर यांच्या २१ व्या पुण्यतिथी निमित्त व श्री. विद्यागुरु खडकीकर यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह व विविध धार्मिक कार्यक्रम सोहळा बुधवार द. २ डिसेंबर पासुन ते बुधवार ९ डिसेंबर २०२६ पर्यंत आयोजित केला आहे.

यामध्ये गुरुचरित्र पारायण व श्री शवमहापुराण कथा व कीर्तनाचे आयोजन असून दैनिक कार्यक्रमामध्ये पहाटे ४ ते ५ काकडा, ५ ते ६ श्रीविष्णूसहस्त्रनाम, सकाळी ते ७ योगशिबिर, सकाळी ८ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ८ ते ११ गुरुचरित्र पारायण, ११ ते १२ श्रींच्या समाधीला अभिषेक व आरती, दुपारी २ ते ५ श्रीमद्भागवतकथा, सायंकाळी ६ ते ८ हरिपाठ व आरती, राक्षी ९ ते ११ किर्तन, रात्री ११ नंतर हरिजागर होईल. श्रीमद्भागवत कथाप्रवक्ते हभप भागवताचार्य अनिल महाराज जोशी माजलगांवकर यांच्या अमृतवाणीतून सात दिवस भागवत कथा दररोज दुपारी २ ते ५ वा. होईल. या सोहळ्याची सुरुवात भव्य शोभायात्रेने बुधवार दि.२ डिसेंबर रोजी सकाळी ११:३० वा. विठ्ठल मंदिर ते कथास्थळापर्यंत होईल. दररोज रात्रौ ९ ते ११ या वेळेत खालीलप्रमाणे कीर्तनाचे कार्यक्रम होतील. दैनिक योगशिबिर दररोज सकाळी ६ ते ७ वा एस. आर. ढोरमारे, डॉ. काकाडे, उबाळे व सहकारी यांच्या मार्गदर्शनाखाली होईल. बुधवार दि. २ डिसेंबर रोजी हभप. गणेश महाराज कोयते, गुरुवार दि. ३ रोजी हभप सूर्यकांत नानामहाराज पुरुषोत्तमपुरीकर, शुक्रवार दि.४ रोजी हभप. डॉ. गणेश बांगर, शनिवार दि.५ रोजी हभप. हनुमान महाराज शेळके, रविवार दि.६ रोजी हभप दुर्गाताई जोशी, सोमवार दि.७ रोजी हभप सुधाकर महाराज राऊत, मंगळवार दि.८ रोजी हभप अनिल महाराज जोशी यांची रात्री ९ ते ११ वा किर्तनसेवा होईल. हभप राधाताई सितारामजी साळुंके व हभप दिलीप महाराज गलांडे पाटील भुम यांची प्रवचन सेवा होईल. सप्ताहाची समाप्ती बुधवार दि. २ डिसेंबर रोजी सकाळी ७ वा श्रीं च्या समाधीस महारुद्राभिषेक होऊन सकाळी ११:३० ते १:३० या वेळी हभप ज्ञानेश्वर महाराज माऊली माजलगांवकर यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होऊन त्यानंतर महाप्रसाद दु.२ ते ५ या वेळेत होईल. तरी सर्व भाविक भक्तांनी श्रीमद्भागवतकथा, कीर्तन, श्रवण व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन प.पू. महायोगी दादामहाराज खडकीकर साधकभक्त परिवारातर्फे श्री. विद्यागुरु खडकीकर महाराज यांनी केले आहे.

भारतीय संविधान एकता,समता, बंधुता व न्यायाचे प्रतिक आहे:राजू जोगदंड

रिपाइंच्या वतीने कुमशी गांवी संविधान दिन साजरा



बीड (प्रतिनिधी):- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून या देशातील समाज बांधवांना दिलेले मूलभूत अधिकार, लोकशाहीची मूल्ये, न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम आगामी काळात रिपाइं कार्यकर्त्यांनी करावे असे आवाहन रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी बीड तालुक्यातील कुमशी या गावी संविधान दिनाचे औचित्य साधून केले.

भारतीय संविधानाने या देशातील तमाम शोषित, पीडित, वंचित उपेक्षितांना आपल्या न्याय व हक्कासाठी मूलभूत अधिकार मिळवून दिले आहेत. त्यामुळे देशात आज सामाजिक न्याय, लोकशाही, समता, स्वातंत्र्य, बंधुता टिकून आहे. आगामी काळात रिपाइं कार्यकर्त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानिक अधिकारांची ताकद व संविधानाची प्रेरणा घेऊन संविधानिक विचा र पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम करावे. असे आवाहन रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी केले. यावेळी किसन तांगडे, शाहू डोळस, सुभाष तांगडे, भास्कर जावळे, भीमराव घोडेराव, कार्यक्रमाचे आयोजक मिठू वाघमारे, रमेश भिसे,कोंडीराम निकम(सरपंच), विनोद काशीद, विष्णुपंत करपे, राजाभाऊ निकम, शंकर निकम,भगवान निकम,साहेबराव शिंदे, भैय्या वाघमारे, बापू निकाळजे, शांतीलाल पवार, मोहन खेमाडे, भागवत साबळे, विजय ओहाळ, विनोद शेजवळ, राहुल कांबळे, विशाल गव्हाणे, दयानंद उबाळे, अविनाश अवघड, किशोर वाघमारे, सोपान वाघमारे, सचिन वाघमारे, अशोक वाघमारे, सौरभ वाघमारे, लक्ष्मी वाघमारे, रोहिणी वाघमारे, मनीषा वाघमारे, सुनीता वाघमारे, बापूसाहेब वाघमारे, रामदास भिसे, आकाश वाघमारे, तुषार वाघमारे आदी उपस्थित होते.

छत्रपती साखर कारखान्याचा शेतकऱ्यांना दिलासा

३,०७१ रुपये प्रति मे. टन दराने ऊस बिले बँकांत वर्ग

माजलगाव (प्रतिनिधी):- तालुक्यातील सोनाजीनगर-सावरगाव येथील 'छत्रपती सहकारी साखर कारखान्या'च्या २०२६-२७ या गळीत हंगामातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी अत्यंत आनंदवार्ता आहे. कारखान्याने गाळप झालेल्या उसाला तब्बल ३,०७१ रुपये प्रति मेट्रिक टन असा दर दिला असून, हे बिल 'शिवमोहन अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी' आणि 'छत्रपती नागरी सहकारी पतसंस्था' (माजलगाव) या बँकांमध्ये वर्ग करण्यात आले आहे.

बायप्रॉडक्ट नसतानाही शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय ! कारखान्याची गाळप क्षमता मर्यादित असली आणि कोणताही उपपदार्थ (बायप्रॉडक्ट) निर्मिती प्रकल्प उपलब्ध नसला, तरीही व्यवस्थापनाने शेतकऱ्यांच्या घामाचे योग्य मोल दिले आहे. चेअरमन बाजीराव जगताप व संपूर्ण संचालक मंडळाने शेतकऱ्यांचे हित केंद्रस्थानी ठेवून नियोजनबद्ध गाळप आणि वेळेवर बिल अदा करण्याचे धोरण राबवले आहे. प्रशासनाचे नियोजनबद्ध पाऊल गळीत हंगामात ऊस उत्पादकांना कोणतीही अडचण भासू नये यासाठी कारखान् प्रशासनाने चोख नियोजन केले आहे. यामुळेच उसाचे गाळप सुरळीत सुरू असून, एफआरपीनुसार उसा उसाचे पैसे थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर वेळेत जमा होत आहेत. कारखान्याचे आवाहन क्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या उसाची कारखान्याकडे नोंदणी करून गाळपासाठी ऊस देऊन सहकार्य करावे. तसेच ज्या शेतकऱ्यांचे ऊस गाळप झाले आहे, त्यांनी संबंधित बँकांशी संपर्क साधून आपली बिले प्राप्त करून घ्यावीत, असे आवाहन कारखाना प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

बहुजन कल्याण विभाग योजनेच्या अर्जांना १० डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

बीड (प्रतिनिधी):- जिल्ह्यातील इमाव, विमाप्र आणि विजाभज प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता बारावीनंतरच्या उच्चशिक्षणासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना भटक्या जमाती क-प्रवर्गासाठी या योजनांचे अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांना आता दि. १० डिसेंबर २०२६ पर्यंत ऑफलाईन पद्धतीने अर्ज सादर करता येतील. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या मुदतवाढीचा फायदा घेऊन ऑफलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून करण्यात आले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न



बीड (प्रतिनिधी): थोर समाजसुधारक, स्त्री शिक्षणाचे जनक, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, शाहूनगर, पांगरी रोड, बीड येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा ज्योतिराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून या शाळेचे मुख्याध्यापक एस.बी मेश्राम यांच्या मुख्य उपस्थितीत अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला. स्त्री शिक्षण, सामाजिक समता, अस्पृश्यता निर्मूलन, शेतकरी व बहुजन समाजाच्या हक्कांसाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची माहिती या शाळेचे मुख्याध्यापक श्री. एस. बी. मेश्राम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

महात्मा फुले यांनी सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरू करून समाजपरिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवली. शिक्षण हेच सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, हा विचार त्यांनी समाजासमोर मांडला. त्यांच्या सत्यशोधक विचारांचा आणि समतेच्या तत्त्वांचा आजही समाजाला मार्गदर्शन मिळत आहे. असे प्रतिपादन या शाळेचे शिक्षक श्री. यु. बी. पवळ यांनी केले. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांच्या विचारांचा आदर्श घेऊन शिक्षण, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाची मूल्ये आपल्या जीवनात अंगीकारावीत, असे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.पवळ यु.बी. यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती एन.जी. मुंडे यांनी केले. कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक आर.बी.घुले, शिक्षकेतर कर्मचारी एल.बी. हजारे, एस. एस. गायकवाड, श्रीमती एन.पी. गायकवाड, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महात्मा फुले यांच्या विचारांना अभिवादन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

महात्मा फुले युवा दलाच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन



बीड (प्रतिनिधी):- क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज बीड शहरातील क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करताना महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख ॲड.सतीश शिंदे, ज्येष्ठ नेते नामदेव भाऊ दुधाळ, माळी महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष लक्ष्मण गुंजाळ सर, रमेश भाऊ दुधाळ, युवा नेते बाळासाहेब धोत्रे, बाळासाहेब लांडगे, भावसार समाजाचे जिल्हाध्यक्ष प्रकाशराव कानगांवकर, वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाचे डी.जी. वानखेडे, श्रीकृष्ण खेत्रे सर, गणेश म्हेत्रे, राघू भैया राऊत, सुधीर शिंदे आदी मान्यवर आदी उपस्थित होते.

स्वातंत्र्य,समता,बंधुता व न्याय संविधानाच्या योग्य अमलबजावणीने शक्य-पी.व्ही.बनसोडे

इंदिरानगर बीड येथे संविधान दिन उत्साहात संपन्न



बीड (प्रतिनिधी): जगातील लिखित असे सर्वश्रेष्ठ भारतीय संविधानाच्या योग्य अमलबजावणीनेच,हजारो वर्षापासून वंचित,बहुजन समाजाला स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय मिळवून देण्याची व देशाची एकात्मता राहील असे प्रतिपादन पी व्ही बनसोडे यांनी केले. महामानव अभिवादन ग्रुप, शाक्य संघ सम्राट अशोका (से.नि. पोलीस अधिकारी व कर्मचारी बहुउद्देशीय सामाजिक संस्था बीड) व संविधान फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने ७७ वा संविधान दिन आयोजित कार्यक्रम प्रसंगी इंदिरानगर, कॅनॉल रोड, बीड येथे अध्यक्षपदी लाभलेले सेवानिवृत्त सीईओ (जि.प.) पी.व्ही. बनसोडे लाभले होते. कार्यक्रमास बीड येथील जेष्ठ विधीज्ञ अविनाश गंडले प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते तर विचार मंचावर वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाचे अध्यक्ष डी.जी. वानखेडे, एडवोकेट राजेश शिंदे, कॅप्टन राजाभाऊ आठवले, से.नि. जिल्हा प्रबंधक यु एस वाघमारे (डखउ), काशिनाथ वाघमारे, वंचित बहुजन पार्टीचे नवनियुक्त अध्यक्ष प्रकाश उजगरे, प्रवक्ता लोकशाहीचा संपादक नितीन मुजमुले, प्रशांत वासनिक व संविधान फाउंडेशनच्या जिल्हाध्यक्षा सुनिता पाटील यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले यांनी तर प्रास्ताविक महमानव अभिवादन ग्रुपचे उपाध्यक्ष प्राध्यापक अशोक गायकवाड यांनी केले व ग्रुप चालवत असलेल्या विविध उपक्रमबद्दल सविस्तर माहिती दिली.सर्वप्रथम जगाला शांती, समता व मैत्रीचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध व भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प व पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी संविधान उद्देशिकाचे सामुदायिक वाचन घेतले. संविधान फाउंडेशन तर्फे महामानव सार्वजनिक वाचनालय व वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाला भारतीय संविधानाचे प्रत्येकी एक एक प्रत भेट दिली. कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे अडवोकेट गंडले अविनाश, उपस्थितांना संविधान दिनानिमित्त संबोधित करताना म्हणाले की, जगात जेव्हा जेव्हा इंटरनॅशनल कॉन्फरन्स किंवा डिबेट्स मध्ये जगातील संविधानाबद्दल चर्चा होते तेव्हा भारतीय संविधान कसे श्रेष्ठ आहे याबद्दल गौरवोद्गार काढले जातात. संविधानातून मिळणारे नागरी हक्क व कर्तव्याबद्दल सतत जागरूक राहून सर्व थरातील नागरिकांना याबद्दल अवगत करणे कसे गरजेचे आहे हे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. सुनिता पाटील, एड. राजेश शिंदे, संपादक नितीन मुजमुले यांनी देखील संविधानाबद्दल सविस्तर माहिती दिली. वंचितचे नवनियुक्त अध्यक्ष प्रकाश उजगरे यांनी सांगितले की डॉक्टर बाबासाहेबांनी प्रकृतीची काळजी न करता देशासाठी एक अनमोल असे संविधान दिले. त्याचेच फळ म्हणजे ज्यांना शिक्षण, मानवी हक्क नाकारले, स्त्री पुरुष असमानता व गौण वागणूक अशा प्रकारच्या गैर वर्तणुकीतून मुक्त करण्याकरिता स्वतंत्र भारतातील प्रत्येक नागरिकास एक व्यक्ती एक मत म्हणजे (वन मॅन, वन वोट) चा हक्क दिला हे समजावून सांगितले. कार्यक्रमास व्ही.एन. निसर्गंध, बी.जी. दळवी, अशोक साळवे, गौतम जावळे, रमेश जावळे, अनिल वीर, दादा शिंदे, शितल जावळे, जयश्री साळवे, सुमित्रा ससाने, कौशल्या घाडगे, सुमन बनसोडे, बेबी साळवे, जयश्री जाधव, मीना घोडके, स्वीटी पवार, राहीबाई जावळे, रमा जावळे. व बहुसंख्य महिला पुरुष व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. महामानव अभिवादन ग्रुप तर्फे २०२५-२६ च्या शालेय साहित्य वाटप कार्यक्रमांतर्गत ५२ विद्यार्थ्यांना वही-पेन वाटप करण्यात आले. शेवटी राष्ट्रगीत घेऊन सरनयतयाने कार्यक्रमाची सांगता झाली.

खा.बजरंग सोनवणे 'दिशा' बैठकीत राष्ट्रीय महामार्गांच्या दुरवस्थेबाबत ठोस निर्णय घेणार का

जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठका केवळ वांझोट्या महामार्गांवरील खड्डे,भेगा आणि अपघातांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष!

बीड (सरकार): बीड जिल्ह्यातील प्रलंबित विकासकामे आणि रस्ते सुरक्षेच्या प्रश्नांना गती देण्यासाठी खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, दि. ३० रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात 'दिशा' आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत जिल्ह्यातील रस्ते सुरक्षेच्या प्रश्नांवरही चर्चा होणार आहे. 'आपल्या समस्या, आमचा पाठपुरावा' या भूमिकेतून खासदारांच्या कार्यालयाने नागरिकांना आपल्या भागातील रस्त्यांसंदर्भातील तक्रारी ९४७७१६१६१६ या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठविण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांचे प्रश्न बैठकीत मांडून त्यावर ठोस कारवाईसाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.या आवाहनाला प्रतिसाद देत सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गांच्या दुरवस्थेचा गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे.

बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डी, खामगाव ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ सी आणि पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२ या मार्गांवरील कामे अनेक ठिकाणी रखडलेली असून, निकृष्ट दर्जाचे काम, रस्त्यांवरील भेगा, तडे आणि मोठमोठे खड्डे यामुळे वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.



या महामार्गांवर वारंवार अपघात होऊन अनेकांना जीव गमवावा लागल्याचा आरोप डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे.

या गंभीर प्रश्नांबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि जिल्हा प्रशासनाला वेळोवेळी निवेदने देऊन आंदोलने करण्यात आली. मात्र, अद्यापही ठोस उपाययोजना झालेल्या नाहीत. त्यामुळे आगामी 'दिशा' बैठकीत खासदार बजरंग सोनवणे या प्रश्नांवर केवळ चर्चा न करता संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरून दुरुस्तीची कालमर्यादा निश्चित करणार का, असा सवाल डॉ. ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नियमितपणे होणाऱ्या जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठका केवळ कागदोपत्री सोपस्कार ठरत असल्याचा आरोप डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे. रस्ते वाहतूक सुरक्षा, अपघात कमी करणे, अपघातप्रवण क्षेत्रांची तपासणी, वेगमर्यादा आणि मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविण्यामुळे होणारे अपघात अशा विषयांवर चर्चा केली जाते. मात्र, रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे होणाऱ्या अपघातांचा प्रश्न गांभीर्याने मांडला जात नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

राष्ट्रीय महामार्गांवरील खड्डे, भेगा आणि निकृष्ट कामांमुळे होणाऱ्या अपघातांची जबाबदारी कोणाची? रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत प्रत्यक्ष रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत निर्णय होत नसतील, तर अशा बैठकांचा उपयोग काय? असा सवाल उपस्थित करत आगामी 'दिशा' बैठकीत राष्ट्रीय महामार्गांच्या दुरुस्तीचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर करावा, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

बहुजन कल्याण विभाग योजनेच्या अर्जांना १० डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

बीड (सरकार)जिल्ह्यातील इमाव, विमाप्र आणि विजाभज प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता बारावीनंतरच्या उच्चशिक्षणासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना भटक्या जमाती क-प्रवर्गासाठी या योजनांचे अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांना आता दि. १० डिसेंबर २०२६ पर्यंत ऑफलाईन पद्धतीने अर्ज सादर करता येतील. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या मुदतवाढीचा फायदा घेऊन ऑफलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून करण्यात आले आहे.

जाती-धर्माच्या भिंती बाजूला ठेवून बीड जिल्ह्याच्या विकासात योगदान द्यावे-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

जिल्हा युवा महोत्सव कार्यक्रम उत्साहात

बीड (सरकार): केवळ शालेय गुणांवर प्रगती अवलंबून नसते, तर तुम्ही कशावर लक्ष केंद्रित करता यावर तुमचे यश विसंबून असते. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात कला व क्रीडा प्रकारात नेहमी सहभाग नोंदविणे गरजेचे असते. स्पर्धेत पहिला किंवा दुसरा क्रमांक मिळविण्यापेक्षा तुमचे सादरीकरण अत्यंत महत्त्वाचे असते. तरी जिल्ह्यातील युवकांनी जाती-धर्माच्या भिंती बाजूला सारून सामाजिक दायित्वाच्या भावनेतून बीड जिल्ह्याच्या विकासात योगदान द्यावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२६-२७ चे आयोजन बीड येथील तुलसी महाविद्यालयाच्या परिसरात करण्यात आले होते. यावेळी तुलसी शैक्षणिक समुहाचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, जिल्हा युवा अधिकारी सागर उज्जैनकर, ज्येष्ठ क्रीडा संघटक प्रा.दिनकर थोरात, राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारार्थी डॉ.कविता गित्ते, राष्ट्रीय खेळाडू श्रीमती क्षितीजा गव्हाणे, प्राचार्य डी.जी. निकाळजे आदिची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, युवकांना योग्य दिशा दाखविण्याची आज नितांत गरज आहे. जिथे तरुणांशी संवाद साधण्याची संधी मिळते, तिथे मी माझ्या व्यस्त बैठका व कार्यक्रमातून वेळात वेळ काढून आवर्जून जातो. विशेषतः जलसंधारण आणि क्रीडा विभागाच्या उपक्रमांना मी नेहमीच प्राधान्य देतो. कला आणि क्रीडा हे आपल्या अत्यंत आवडीचे विषय असल्याचे नमूद करत ते पुढे म्हणाले, मी माझ्या व्यस्त जीवनशैलीतून वेळ काढून आजही नियमित खेळ खेळतो. तरुणांनीही जबाबदारीने वर्तन करून आपले गाव आणि शहराच्या प्रगतीसाठी हातभार लावावा. या युवा महोत्सवाच्या माध्यमातून बीडच्या तरुणांनी आपले कौशल्य सिद्ध करून विभाग आणि राज्यस्तरावर जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे. असेही त्यांनी सांगितले.

छत्तीसगड येथील रायपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या वंदे मातरम या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात बीड जिल्ह्याच्या युवकांनी महाराष्ट्र राज्याचे आणि बीड जिल्ह्याचे अत्यंत प्रभावी व भरभक्कम प्रतिनिधित्व केले आहे. सांस्कृतिक, बहुभाषिक आणि सामाजिक विषयावर दिलेल्या उत्कृष्ट योगदानाबद्दल या युवकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. जिल्हा युवा अधिकारी, बीड यांच्या वतीने या शिष्टमंडळाची निवड करण्यात आली होती.



बीड येथे झालेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या प्रमुख उपस्थितीत या कलाकारांनी आपली कला सादर करून उपस्थितांची मने जिंकली होती. यामध्ये तुलसी महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. अंकिता जाधव हिने पिकलं जांभूळ तोडू नका या बहारदार लावणीवर तर केज येथील साने गुरुजी विद्यालयाची विद्यार्थिनीने कु. गौरी आशोबा घुले हिने आपल्या चढविला पट्टा कमरेवरी या लावणी सादरीकरणातून उपस्थितांची दाद मिळवली. तसेच इन्फिनिटी डान्स ग्रुपच्या वतीने सादर करण्यात आलेल्या लल्लाटी भंडार या गाण्यावरील नृत्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

महोत्सवाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले तर आभार जिल्हा युवा अधिकारी सागर उज्जैनकर यांनी मानले.

जिल्हा युवा महोत्सवासाठी परीक्षक म्हणून प्रा. दीपक जमदाडे, प्रा. संतोष मस्के, विलास सोनवणे, प्रा. पांडुरंग सुतार, प्रा. राम गव्हाणे, डॉ. संजय कांबळे, डॉ. संदीप परदेशी, प्रा. सुमित गायकवाड, रवी धुताडमल, लक्ष्मीकांत दोडके, जितेंद्र आराक, सुमित गाडे, डॉ. श्रीकांत पुरी, बालासाहेब कांबळे आणि श्रीमती क्षितीजा गव्हाणे यांनी अत्यंत पारदर्शकपणे कर्तव्य पार पाडले.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर आणि जिल्हा युवा अधिकारी सागर उज्जैनकर यांच्या मार्गदर्शनाखाली तुलसी महाविद्यालयाचे प्राचार्य डी.जी. निकाळजे, प्रा.चंद्रशेखर किरवले, तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड, अनिकेत काळे, क्रीडा मार्गदर्शक सतिष राठोड, रेवननाथ शेलार, युवा महोत्सव संयोजक जितेंद्र आराक, धनेश करांडे, तुलसी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व कर्मचारी वृंद, मयुर पाठक, दिनकर चर्के आदीनी परिश्रम घेतले. हा महोत्सव विद्यार्थी-विद्यार्थींनी, युवक-युवतींच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.

परमिट देऊन बियाणे मिळत नसेल तर शेतकऱ्यांनी पेरणी कशी करावी?

तातडीने पुरवठा करा, अन्यथा रुमणे घेऊन रस्त्यावर उतरू!

अॅड.जीवनराव देशमुख यांचा इशारा

परळी वैजनाथ (सरकार)रब्बी हंगामातील हरभरा पेरणीसाठी शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी करून शासनाकडून परमिट मिळवले; मात्र परमिट हातात असूनही परळी शहरातील तीन दुकानांवर हरभरा बियाणे उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. बियाणे मिळत नसल्यामुळे पेरणी कशी करायची, असा चिंताग्रस्त सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. आधीच दुष्काळाने होरपळलेल्या शेतकऱ्यांची खरीप हंगामात मोठी निराशा झाली. रब्बी हंगामात तरी काहीतरी उत्पन्न मिळेल, या अपेक्षेने शेतकरी तयारीला लागले असताना बियाण्यांअभावी पेरणीच खोळंबल्याचे चित्र आहे.

शासनाकडून ऑनलाइन नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करून हरभरा बियाण्याचे परमिट देण्यात आले. मात्र प्रत्यक्ष बियाणे खरेदीसाठी शेतकरी दुकानांवर गेले असता बियाणे उपलब्ध नसल्याचे सांगितले जात आहे. परळी शहरातील संबंधित तीन दुकानांवर हरभरा बियाण्यांचा साठा नसल्याने शेतकऱ्यांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. महाबीजकडून पुरेसा बियाणे पुरवठा झालेला नसल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे.

एकीकडे कृषी विभागाकडून ऑनलाइन नोंदणी आणि परमिट देण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाते, तर दुसरीकडे प्रत्यक्षात बियाणेच उपलब्ध होत नाही. त्यामुळे कृषी विभाग असून अडचण आणि नसून अडचण, अशी अवस्था निर्माण झाली आहे. परमिट मिळवूनही बियाणे मिळत नसेल तर शेतकऱ्यांनी पेरणी करायची तरी कशी, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. आधीच यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. खरीप हंगाम पूर्णपणे हातातून गेल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. आता रब्बी हंगामात हरभऱ्याच्या पिकातून काहीतरी आर्थिक आधार मिळेल, अशी अपेक्षा असताना बियाण्यांच्या टंचाईमुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पेरणीचा योग्य कालावधी निघून गेल्यास त्याचा उत्पादनावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. बियाणे उपलब्ध करा, अन्यथा रुमणे घेऊन आंदोलन करणार परळी तालुक्यातील शेतकऱ्यांना तातडीने हरभरा बियाणे उपलब्ध करून द्यावे. ऑनलाइन नोंदणी करून परमिट दिल्यानंतर बियाणे पुरवण्याची जबाबदारीही संबंधित यंत्रणेने पार पाडली पाहिजे. महाबीजकडून तातडीने बियाण्यांचा पुरवठा करून शेतकऱ्यांची गैरसोय दूर करावी. अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शेतकऱ्यांना सोबत घेऊन रुमणे हातात घेत आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी शहराध्यक्ष अॅड.जीवनराव देशमुख यांनी दिला आहे.

रिपाइंच्या वतीने कुमशी गांवी संविधान दिन साजरा

बीड (सरकार) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून या देशातील समाज बांधवांना दिलेले मूलभूत अधिकार, लोकशाहीची मूल्ये, न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम आगामी काळात रिपाइं कार्यकर्त्यांनी करावे असे आवाहन रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी बीड तालुक्यातील कुमशी या गावी संविधान दिनाचे औचित्य साधून केले.

भारतीय संविधानाने या देशातील तमाम शोषित, पीडित, वंचित उपेक्षितांना आपल्या न्याय व हक्कासाठी मूलभूत अधिकार मिळवून दिले आहेत. त्यामुळे देशात आज सामाजिक न्याय, लोकशाही, समता, स्वातंत्र्य, बंधुता टिकून आहे. आगामी काळात रिपाइं कार्यकर्त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानिक अधिकारांची ताकद व संविधानाची प्रेरणा घेऊन संविधानिक विचा र पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम करावे. असे आवाहन रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी केले.



यावेळी किसन तांगडे, शाहू डोळस, सुभाष तांगडे, भास्कर जावळे, भीमराव घोडेराव, कार्यक्रमाचे आयोजक मिठू वाघमारे, रमेश भिसे,कोंडीराम निकम(सरपंच), विनोद काशीद, विष्णुपंत करपे, राजाभाऊ निकम, शंकर निकम,भगवान निकम,साहेबराव शिंदे, भैय्या वाघमारे, बापू निकाळजे, शांतीलाल पवार, मोहन खेमाडे, भागवत साबळे, विजय ओहाळ, विनोद शेजवळ, राहुल कांबळे, विशाल गव्हाणे, दयानंद उबाळे, अविनाश अवघड, किशोर वाघमारे, सोपान वाघमारे, सचिन वाघमारे, अशोक वाघमारे, सौरभ वाघमारे, लक्ष्मी वाघमारे, रोहिणी वाघमारे, मनीषा वाघमारे, सुनीता वाघमारे, बापूसाहेब वाघमारे, रामदास भिसे, आकाश वाघमारे, तुषार वाघमारे आदी उपस्थित होते.

बीड येथील खेलो इंडिया कबड्डी केंद्रासाठी १ डिसेंबर रोजी निवड चाचणी

बीड (सरकार) केंद्र शासनाच्या युवा व क्रीडा मंत्रालयाच्या खेलो इंडिया योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यासाठी मंजूर झालेल्या जिल्हास्तर कबड्डी प्रशिक्षण केंद्राच्या प्रवेशासाठी मंगळवार, दि. १ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत बीड येथील जिल्हा क्रीडा संकुलात ही चाचणी पार पडणार असून १२ वर्षांखालील मुला-मुलींनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

देशातील विविध जिल्ह्यांमध्ये पुढील चार वर्षांत एक हजार खेलो इंडिया केंद्रे उभारण्यात येत असून या अंतर्गत बीडला कबड्डी केंद्राची मान्यता मिळाली आहे. जिल्ह्यातील उत्कृष्ट १५ मुले आणि १५ मुली खेळाडूंची तज्ञ निवड समितीमार्फत निवड करून त्यांना तंत्रशुद्ध प्रशिक्षण देणे आणि प्रतिभावान खेळाडू घडवणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. हे प्रशिक्षण पूर्णपणे अनिवासी स्वरूपाचे असून, निवड झालेल्या खेळाडूंना दररोज सकाळी व सायंकाळी तज्ञ प्रशिक्षकांद्वारे मार्गदर्शन केले जाईल. खेळाडूंची शारीरिक क्षमता तपासण्यासाठी एकूण ९ प्रकारच्या चाचण्या घेतल्या जाणार असून, यातील गुणानुक्रमे उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची अंतिम निवड होईल. विहित नमुन्यातील अर्ज, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, आधारकार्ड आणि जन्म तारखेचा मूळ दाखला व त्यांच्या दोन सत्यप्रती चाचणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक आहे. कागदपत्रांशिवाय चाचणीत प्रवेश दिला जाणार नाही. अधिक माहितीसाठी इच्छुक खेळाडू व पालकांनी कार्यालयीन वेळेत क्रीडा मार्गदर्शक रेवननाथ शेलार (मो. ९०७५४७६७९१) किंवा सतीश राठोड (मो. ९९२३०१९३५३) यांच्याशी संपर्क साधावा, असे जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड यांनी कळविले आहे.

परळीतील भीमनगर येथे रविवारी मैथिली-निखिल यांचा मंगल परिणय सोहळाचे आयोजन

मंगल परिणय सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे जगतकर परिवाराचे आवाहन

परळी वैजनाथ (सरकार)शहरातील भीमनगर, जगतकर गल्ली येथे आयु. मैथिली आणि आयु. निखिल यांचा मंगल परिणय सोहळा रविवार, दि. २९ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजून ५ मिनिटांनी उत्साहात संपन्न होणार आहे. तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या धम्मविचारांचा आणि बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी विचारांचा आदर्श समोर ठेवून बौद्ध पद्धतीने या विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. आयु. मैथिली या विमल प्रकाश जगतकर यांच्या नात व मीना राहुल जगतकर यांच्या ज्येष्ठ कन्या आहेत, तर आयु. निखिल हे प्रभाकर गोदाम यांचे नातू व स्तवशिला अनिल गोदाम यांचे द्वितीय चिरंजीव आहेत.

आयु. मैथिली या बौद्ध विमल प्रकाश जगतकर यांच्या नात व सौ. मीना राहुल जगतकर यांच्या ज्येष्ठ कन्या आहेत. तर आयु. निखिल हे बौद्ध प्रभाकर गोदाम यांचे नातू व सौ. स्तवशिला अनिल गोदाम यांचे द्वितीय चिरंजीव आहेत. या दोघांचा विवाह सोहळा बुद्ध, धम्म आणि संघ या त्रिरत्नांच्या साक्षीने बौद्ध परंपरेनुसार संपन्न होणार आहे. 'सब्बपापस्स अकरणं, कुसलस्स उपसम्पदा, सचित्तपरियोदपनं, एतं बुद्धानं सासनं' या भगवान गौतम बुद्धांच्या मंगल उपदेशाचा संदेश देत नवदाम्पत्य नव्या आयुष्याची सुरुवात करणार आहे. दोन कुटुंबांना स्नेहाच्या बंधनात जोडणारा हा मंगल सोहळा आनंदात आणि उत्साहात पार पडणार आहे.

बुद्ध, धम्म आणि संघ या त्रिरत्नांच्या साक्षीने दोन कुटुंबांना स्नेहबंधात जोडणारा हा मंगल सोहळा सुगंध कुटी बुद्धविहार, भीमनगर, जगतकर गल्ली येथे पार पडणार आहे. भगवान बुद्धांनी दिलेल्या सदाचार, मैत्री, करुणा आणि प्रज्ञेच्या विचारांचा संदेश या विवाह सोहळ्यातून अधोरेखित होणार आहे. नवदाम्पत्याच्या नव्या जीवनप्रवासाला शुभेच्छा देण्यासाठी नातेवाईक, मित्रमंडळी आणि समाजबांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

या मंगल प्रसंगी परळी शहर व परिसरातील सर्व समाजबांधव, उपासक-उपासिका, नातेवाईक आणि हितचिंतकांनी सहकुटुंब मोठ्या संख्येने उपस्थित राहून नवदाम्पत्यास शुभाशीर्वाद द्यावेत व आपल्या उपस्थितीने सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन आयु. प्रकाश संभाजी जगतकर, आयु. कपिल प्रकाश जगतकर, आयु. राहुल प्रकाश जगतकर, आयु. गंगाधर प्रकाश जगतकर, आयु. डॉ. रवींद्र प्रकाश जगतकर व समस्त जगतकर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

मैथिली-निखिल यांच्या मंगल परिणय सोहळ्यानिमित्त जगतकर परिवाराकडून गेल्या महिनाभरापासून तयारी सुरू आहे. निमंत्रण पत्रिकांचे वाटप मोठ्या प्रमाणावर करण्यात आले असून नातेवाईक, मित्रपरिवार आणि समाजबांधवांना प्रत्यक्ष भेटून निमंत्रित करण्यात आले आहे. विवाह सोहळ्यासाठी भव्य-दिव्य मंडप उभारण्यात आला असून पाहुण्यांसाठी भोजन व्यवस्थेचीही विशेष तयारी करण्यात आली आहे. या मंगल सोहळ्यात कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी नातेवाईक, मित्रपरिवार आणि समस्त जगतकर परिवारातील सदस्य उत्साहाने आणि एकजुटीने परिश्रम घेत आहेत. सोहळा भव्य स्वरूपात पार पाडण्यासाठी परिवाराची जोरदार लगबग सुरू आहे.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)

Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)